# दुचाकी वाहने चोरी करणा-या रेकॉर्डवरील इसमास अटक ७ दुचाकी वाहने हस्तगत

दि.०५/०८/२०१७ रोजी ११.३० वा.चे साहित्य परिषद चौक, टिळक रोड,पुणे येथे रेकॉर्डवरिल गुन्हेगार नामे महेश रघुनाथ जवरट ऊर्फ जाधव वय २६ वर्ष व्यवसाय मजुरी सध्या रा. घर नं ४२, फुगेवाडी, पाण्याचे टाकीजवळ, दापोडी, पुणे मुळ राहणार मु. केशवनगर पो. पाली. डब्ल्यू. डी. ऑफिसचे बाजूस ता. सुधागड, जिल्हा रायगड हा पांढ-या रंगाची ॲक्टीव्हा गाडी नंबर एम.एच. १२ जे.डी. ६३८८ ही घेऊन थांबलेला मिळून आला त्याचेकडे गाडी बाबत चौकशी करता तो काहीएक माहीती सांगंत नसल्याने त्यास सीआरपीसी ४१ १ प्रमाणे दिनांक दि.०५/०८/२०१७ रोजी १५.३० वाजता अटक करून अटक मुदतीत त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे तपास करता त्याने एकुण वेगवेगळया ठिकाणाहुन चोरलेल्या ७ दुचाकी गाडया अनुक्रमे ॲक्टीव्हा ३, स्पेलन्डर ३, व सीबीझेड १, अशा किंमत रूपये ३,१०,००० रूपयाच्या काढुण दिल्या .

वर जप्त दुचाकी बाबात खालील पोलीस ठाणेकडील

१. विश्रामबाग पो. ठोणे गुरक्र. १८६/१७ भादविक. ३७९
२. विश्रामबाग पो. ठोणे गुरक्र. ३६७/१७ भादविक. ३७९
३. विश्रांतवाडी पो. ठोणे गुरक्र. २९७/१७ भादविक. ३७९
४. मार्केटयार्ड पो. ठोणे गुरक्र. ३६७/१७ भादविक. ३७९
५. भोसरी पो. ठोणे गुरक्र. १५७/१७ भादविक. ३७९

गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

आरोपित हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, त्याचेविरूध्द पेन पोलीस ठाणे जि. रायगड गुरक्र. ५१/१६ भादंविक. ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे.

आरोपित हा गाडयांचे इग्नेशियन डायरेक्ट करून गाडया चोरी करतो, व फिरवुन फिरवुन गाडया आडबाजुस सोडुन देत असतो. तसेच कधी कधी गाडया १००० ते २००० रुपयांना विकण्याचा प्रयत्न करतो.

वरील कामगिरी गुन्हे शाखा श्री. प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री.सुधीर हिरेमठ ,पोलीस उप आयुक्त सायबर व ईओडब्ल्लू, श्री. पंकज ढहाणे, पोलीस उप आयुक्त, श्री. सुरेश भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे श्री. सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट ३ गुन्हे शाखा, श्री. रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस निरीक्षक, शिवानंदन स्वामी, पोहवा. अनिल भोसले, अतुल साठे, संदिप राठोड, संदिप तळेकर, कल्पेश बनसोडे, महेंद्र पवार, गजानन गाणबोटे यांनी केली आहे.

